# प्रेसनोट
## २६ जानेवारी गणतंत्र दिवस साजरा करण्यात आला.

जा.क्र. ५६ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडार
दिनांकः—२७/१/२०१७

भंडारा :— येथील पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर दि. २६/०१/२०१७ रोजी २६ जानेवारी गणतंत्र दिवस साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे मा. ना. श्री. महादेव जानकर मंत्री, पशु संवर्धन दुग्ध विकास, मत्स्य व्यवसाय, श्री. सुहास दिवसे जिल्हाधिकारी भंडारा तसेच विनिता साहू ,पोलीस अधिक्षक भंडारा, रश्मी नांदेडकर, अप्पर पोलीस अधिक्षक तसेच सर्व विभागाचे प्रशासकीय अधिकारी, व विदयार्थी, पालक नागरीक, पत्रकार हजर होते. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहण व राष्ट्रगीताने करण्यात आली मा. ना. श्री. महादेव जानकर मंत्री, पशु संवर्धन दुग्ध विकास, मस्य व्यवसाय ध्वजारोहण यांच्या हस्ते करण्यात आले.

त्यानंतर मा. ना. श्री. महादेव जानकर मंत्री, पशु संवर्धन दुग्ध विकास, मस्य व्यवसाय यांनी परेडचे निरीक्षण केले. यावेळी भंडारा जिल्हा पोलीस दल, भंडारा गृहरक्षक दल, एनसी. पथक, दामीणी पथक,पोलीस श्वान पथक मिळुन अशा २३ पथंकाचा समावेश होता. यावेळी परेड कमांडर उपविभागीय पोलीस अधिकारी साकोली डिसले दुय्यम परेड कमांडर राखीव पोलीस निरीक्षक भंडारा वर्मा हे होते.

या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुने मा. ना. श्री. महादेव जानकर मंत्री, पशु संवर्धन दुग्ध विकास, मस्य व्यवसाय भंडारा यांनी आपल्या भाषणात उपस्थीत असलेल्या सर्वाना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच कृषी विकास, दुग्ध विकास, उत्पादन रेशिम विकास, मत्स्य व्यवसाय, रोजगार निर्मीती, आरोग्य व शिक्षण क्षेत्रात भरीव कार्य करण्याचे प्रशासनाचे नियोजन बाहे, यासोबत सक्षम हा अभिनव उपक्रम जिल्हा प्रशासनाने हाती घेतला आहे. जलयुक्त शिवार अभियान राबविणे ''मेक इन महाराष्ट्राची'' बिजे रोवली गेली आहे. रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न केले आहे. शासनाचा कौशल्य विकासावर अधिक भर आहे. स्वच्छ भारत अभियाना अंर्तगत पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन मार्फत ५६ हजार ९१८ वैयक्तीक शौचालय बांधकाम पुर्ण करण्यात आले आहेत. आठवी ते बारावी शिक्षण घेणा—या व शाळेपासुन ० ते ०५ किलो मिटर अंतरावर वास्तव्यात असाना—या मुलींसाठी शासनाने मोफत सायकल वाटप योजना सुरू केली आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जिल्हयात २ लाख ५ हजार ३४३ कुटुंबानी रोजगार मिळण्यासाठी नोंदणी केली असुन या नोंदणीकृत कुंटुबाना रोजगार पत्रकाचे वाटप करण्यात आले आहे. भंडारा जिल्हा हा तलावांचा जिल्हा म्हणुन ओळखला जातो. उपलब्ध मत्स्य व्यवसायासाठी करण्यात येत आहे, हमी योजनते जिल्हयात किडा, वन्य प्राणी, राष्ट्रीय आरोग्य अभियान गोसे खुर्द प्रकल्प, फिरते पोलीस स्टेशन हा अभिनव उपक्रम भंडारा पोलीस दलाने जिल्हयाभर राबवीला आहे. शासन आपल्या दारी या संकल्पनेवर आधारीत या उपक्रमाचे नियोजन करण्यात येतो. मिशन संभव, शहरामध्ये मुझीकल जिंगल कार्यक्रम राबविण्यात येत आहे. इंत्यादी उपक्रमाची माहीती दिली.

महाराष्ट्र पोलीस क्रिडा स्पर्धेत ४ बाय १०० मिटर रिले – मध्ये तृतीय क्रमांक पटकवनारे– महिला पोलीस कर्मचारी १) योगिता सिंगनझोडे ब.न. १३१८ २) माधुरी चामट ब.न. १५२१,यांना मान्यवंराचे हस्ते पारितोषीक प्रदान करण्यात आले.

यावेळी सांस्कृतीक कार्यक्रमा मध्ये जेसीस कॉन्व्हेंट भंडाराा येथील विदयार्थ्यांचे समुह देशभक्ती गित, सादर केले. सेंट पॉल हायस्कुल भंडारा येथील विदयार्थ्यांनी पथनाटय सादर केले.

यावेळी कार्यक्रमाला मा. विनीता साहू, पोलीस अधीक्षक भंडारा, रश्मी नांदेडकर अपर पोलीस अधिक्षक, जिल्हा माहीती अधिकारी भंडारा,उपविभागिय पोलीस अधिकारी श्री. डिसले साकोली, राखीव पोलीस निरीक्षक (पो. मु.) श्री. वर्मा, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. तसेच भंडारा पोलीस दलातील विविध शाखेचे/पो.स्टे.चे पोलीस अधिकारी/कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी, ईलेक्ट्रॉक मिडीया, पत्रकार बंधु, व मोठया प्रमाणात विविध क्षेत्रातील जनसमुह उपतस्थित होता. कार्यक्राचे सुत्रसंचालन श्रीमती स्मिता गालफाडे व मुंकुद ठवकर यांनी केले.

पोनी. (एस.आर. तेलुरे)
जिविशा शाखा
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१२५३५४९

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.